नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५७ Issue - 257 | वार शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६ Blow- Friday Date 6 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वागदरी जिल्हा परिषद गटाच्या सर्वांगीण विकासासाठी राजेश्री शेळके सह दोन्ही पंचायत समिती सदस्यांना निवडून द्या : आ. सचिनदादा कल्याणशेट्टी

## सभेची गर्दी पाहता तिन्ही उमेदवाराचे विजयी निश्चित, प्रचंड गर्दीने प्रचार सभेने सांगता









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /प्रतिनिधी : वागदरी जिल्हा परिषद गटाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद उमेदवार जयश्री शेळके वागदरी पंचायत समिती उमेदवार अप्पासाहेब किवडे, शिरवळ पंचायत समिती उमेदवार राजेंद्र बंदीछोडे यांना निवडून द्या आपल्या गावाच्या विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हणाले वागदरी येथे आयोजित सभेत बोलतो होते वागदरी जिल्हा परिषद गटामध्ये गेल्या सहावर्षात अनेक विकास कामे करीत असून शेतकऱ्याचे मोठी समस्या असलेले शेती लाईट चे काम भुरीकवठे येथे ३३ के व्ही उपकेंद्र करून सोय करून देण्यात आले व दिवसा लाईट देण्यात येत आहे, भुरीकवठे वागदरी अक्कलकोट नवीन रस्ता मंजूर होऊन टेंडर प्रक्रिया पूर्ण झाले आहे अनेक विकास कामे या भागात केले असून पुढे ही मोठया प्रमाणात विकास कामे करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवार यांना निवडून द्या असे आवाहन आ सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी केले

**आज पर्यतच्या इतिहासामध्ये येवढ्या प्रचंड गर्दीने सभा झालेले नाहीत आजची गर्दी खूप काही सांगून जात असून आपल्या तालुक्याचे लाडके लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे हात बळकट करण्यासाठी लाडक्या बहिणीला जिल्हा परिषद मध्ये व लाडक्या भावाना पंचायत समिती मध्ये आपले प्रतिनिधी म्हणून पाठवण्यासाठी वागदरी जिल्हा परिषद गटातील मतदार तयारी झाल्याचे दिसून येत होते.**

यावेळी बोलताना कार्यक्रम अध्यक्ष विजयकुमार ढोपरे म्हणाले की मी स्वतः दोन वेळा सरपंच व जिल्हा परिषद सदस्य झालेले असून माझ्या कार्यकाळात मी जनतेचे प्रामाणिक सेवा करण्याचे प्रयत्न केले आहे त्या उलट आनंद तानवडे यांनी जिल्हा परिषद सदस्य असताना हक्काचे निधी टक्केवारी घेऊन दुसऱ्या तालुक्याला विकले आहे, आमच्या गावात परमेश्वर मंदिर, सह अनेक ठिकाणी दिलेल्या निधी मध्ये दहा ते पंधरा टक्के टक्केवारी घेऊन निधी दिले आहे असल्या लोक प्रतिनिधी निधी दिल्याचे सांगत आहे त्यांनी आत्म परीक्षण करावे तानवडे जर भाजपचे निष्ठावंत असले असते तर पक्षाचे आदेश मानले असते व प्रामाणिक काम केले असते त्यांना स्वतःचे स्वार्थ बघायचं असून टक्केवारी घेऊन स्वतःच घर भरायचे आहे त्यासाठी शेवटच्या दिवशी तानवडे भाजपाशी गद्दार करून गेले आहे यांचे मतदार धडा शिकवतील, मी देखील जिल्हा परिषद साठी उमेदवारी मागितले होते परंतु दादाच्या एका शब्दाने माघारी घेतले आहे व भाजपासोबत एकनिष्ठ राहील आहे हे भाजपचे शिकवण आहेत

विविध मान्यवर मनोगत व्यक्त केले यावेळी बोलताना जिल्हा परिषद उमेदवार राजेश्री शेळके म्हणाले की, मी आपल्या जिल्हा परिषद गटामधील गावाच्या विकासाठी प्रामाणिक काम करेन मला आपले व आपल्या गावाच्या विकासासाठी एक संधी द्या यावेळी वागदरी पंचायत समिती गणतील उमेदवार अप्पासाहेब किवडे, शिरवळ पंचायत समिती गणतील उमेदवार राजेंद्र बंदिछोडे, नगरसेवक अविनाश मंडीखांबे, मधुकर सुरवसे, प्रदीप जगताप, शरणप्पा मंगाणे, प्रदीप पाटील अप्पासाहेब बिराजदार, कमलाकर सोनकांबळे, सुनील सावंत, पंकज सुतार मुरगेंद्र मुंदीनकेरी बा ना चव्हाण, बाळासाहेब भोसले दयानंद कुंभार यासह जिल्हा परिषद गटातील सर्व गावाचे सरपंच उपसरपंच भाजपा पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थिती होते सूत्रसंचालन महादेव सोनकवडे यांनी केले यावेळी सभेस प्रचंड गर्दी झाले होते या गर्दीचे लोकांमध्ये विजयाची नांदी असल्याचे चर्चा रंगली होती.

# निवडणूक रडून नाही तर कर्तृत्वावर लढवावी लागते : सचिन कल्याणशेट्टी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ अक्कलकोट : निवडणूक मतदारांसमोर रडून नव्हे तर केलेल्या विकासकामांच्या कर्तृत्वावर लढवावी लागते, असा सणसणीत टोला अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विरोधकांना लगावला.

भाजपच्या जिल्हा परिषद वागदरी गटाच्या उमेदवार राजेश्री शेळके, पंचायत समिती शिरवळ गणाचे उमेदवार राजेंद्र बंदीछोडे, वागदरी पंचायत समिती गणाचे उमेदवार आप्पासाहेब किवडे यांच्या प्रचारार्थ शिरवळ येथे रविवारी झालेल्या प्रचारसभेत आ. सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.

## शिरवळच्या सभेत विरोधकांना टोला

याप्रसंगी वागदरी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार राजेश्री बसवराज शेळके, वागदरी गणाचे उमेदवार अप्पासाहेब धोंडप्पा किवडे, शिरवळ गणाचे उमेदवार राजेंद्र धुळप्पा बंदिछोडे यांची प्रचार सभा शिरवळ येथे घेण्यात आली. यावेळी अप्पासाहेब बिराजदार, रविकिरण व्हर्नाळे, बाबासाहेब पाटील, बसवराज शेळके, प्रदीप जगताप, बाळासाहेब भोसले, राजू किवडे, मल्लिकार्जुन शिदोरे, कमलाकर सोनकांबळे, दयानंद कवडे, निशांत कवडे, पंडित पाटील, सिद्धाराम कुंटोजी, धनराज बिराजदार, सोमनाथ पाटील, सिद्धाराम बिराजदार, सचिन घुगरे, सुनील सावंत, रवी राठोड, दया कुंभार उपस्थित होते.

### युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाजपच्या गोटात

**अक्कलकोट तालुका युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष निशांत कवडे यांनी शिरवळ येथील प्रचार सभेत भाजपत प्रवेश केला. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी त्यांना पक्षाचे उपरणे परिधान करून पक्षात स्वागत केले. त्यांच्या समवेत दयानंद कवडे, पंडित पाटील यांनीही भाजपत प्रवेश केला. मोठ्या भावाप्रमाणे निशांत कवडे यांच्या पाठीशी राहणार असल्याचा शब्द आ. कल्याणशेट्टी यांनी दिला.**

आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, शिरवळ हे भाजपला मानणारे गाव आहे. भाजप नेत्यांच्या नव्हे तर कार्यकर्त्यांच्या जिवावर चालणारा पक्ष आहे. जनतेचा

विश्वास आणि श्वास कमळच आहे. आजवर कोट्यवधी रुपयांची विकासकामे शिरवळ आणि परिसरासाठी झाली आहेत. विरोधकांना भाजपने केलेल्या विकासकामांबाबत शंका असेल तर त्यांना विकासकामांची यादी पोस्टाने पाठवण्याची व्यवस्था करण्यात येईल, असेही आमदार सचिन कल्याणशेट्टी याप्रसंगी म्हणाले.

# आनंद तानवडे यांनी निष्ठावंत या शब्दाला कधीच काळीमा फासला : राजश्री शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माझी जि प सदस्य आनंद तानवडे यांना निष्ठावंत म्हणुन बोलण्याचा नैतिक अधिकार नाही.प्रत्येक निवडणुकीत निष्ठावंत या शब्दाला काळीमा फासण्याचा कुटील कारस्थान आनंद तानवडे यांनी केला असल्याचे प्रतिपादन वागदरी जि प मतदार संघातील भाजपाचे उमेदवार राजेश्री शेळके यांनी केले.





वागदरी जि प व पंचायत समिती निवडणुकीत भाजप व शिवसेना यांच्यात काट्याची टक्कर होत आहे.प्रत्येक गावभेटी दरम्यान माजी जि प सदस्य आनंद तानवडे यांनी निष्ठावंत चा मुद्दा मांडत आहेत .

या विषयी बोलताना वागदरी जि प भाजपाचे उमेदवार राजेश्री शेळके म्हणाल्या की . आनंद तानवडे हे संधी सादु राजकारणी आहे.फक्त स्वता:च्या राजकिय फायद्यासाठी भाजपाचा वापर केला आहे.प्रत्येक विधान सभेच्या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवाराशी गद्दार केला आहे.त्यामुळेच भाजपाचे माजी आमदार कै.सिद्रामप्पा पाटील यांनी आनंद तानवडे यांना कधीच जवळीक केले नाही त्यांच्यावर विश्वास ठेवले नाही.मागील विधानसभा निवडणुकीत आ.सचिन दादा कल्याणशट्टी यांच्या मांडीला मांडी लावुन बसले.नंतर निवडणुकीत ऐन मोक्याच्या क्षणी माजी मंत्री त्यावेळचे कॉग्रेसचे उमेदवार सिध्दाराम म्हेत्रे यांचे प्रचार केले.तेव्हा निष्ठावंत या शब्दाला काळीमा फासलेल्यानी निष्ठावंत बध्दल धडे देवु नये असा इशारा शेळके यांनी दिला.

१९९१ मध्ये कै.रत्नाबाई शेळके भाजपाचे वतीने जि प सदस्या म्हणुन निवडून आल्या आहेत.वागदरी जि प मतदार संघात शेळके घराण्यावर प्रेम करणारे मतदार आहेत.हे विसरून चालणार नाही. आनंद तानवडे प्रत्येक गावात विकासाला निधी दिल्याचे सांगत आहे.

मतदारांनी मतदानाद्वारे गावाच्या विकाला निवडून दिले आहे.मग विकास करणे प्रत्येक सदस्याचे कर्तव्य आहे.मात्र आनंद तानवडे यांनी निधी देताना प्रत्येक गावातुन टक्केवारी घेतले आहे.

वागदरी परमेश्वर देवास्थानला निधी देताना दोन लाख रू टक्केवारी घेतले. घाळीदास मंदिराला निधी देताना २५ हजाराची टक्केवारी घेतले. प्रत्येक ठिकाणी हेच काम केले आहे.तेव्हा आनंद तानवडे यांनी आत्मपरिक्षण करावा.नंतर बोलावा.असे सल्ला शेळके यांनी दिले.

## संपादकीय....

### व्यापार युद्ध

भारत आणि अमेरिकेतील बहुप्रतीक्षित ट्रेड डील च्या घोषणेनंतर, मोदी सरकारकडून तेल खरेदीवर रशियाचे विधान समोर आले आहे. रशियाने सांगितले की भारत कोणत्याही देशाकडून तेल खरेदी करण्यास स्वतंत्र आहे. अशाप्रकारे, रशियाने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा पूर्णपणे खोडून काढला ज्यामध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्षणी भारताने रशियन तेल खरेदी थांबवण्यास सहमती दर्शविली असल्याचे म्हटले होते. रशियन परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की भारताने रशियन कच्च्या तेलाबद्दलची आपली भूमिका बदलली आहे असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. रशियन मंत्रालयाने भारत-रशियामधील ऊर्जा व्यापार दोन्ही देशांसाठी फायदेशीर आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारात स्थिरता राखण्यास मदत करतो, असा पुनरुच्चार केला. त्याचवेळी, भारत कोणत्याही देशाकडून कच्चे तेल खरेदी करू शकतो आणि भारताच्या तेल स्रोतांमध्ये विविधता आणण्याच्या इच्छेत काहीही नवीन नाही असेही रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय आयातींवर २५% दंडात्मक शुल्क लादल्यानंतरही भारताने दररोज सुमारे १.५ दशलक्ष बॅरल रशियन क्रूड आयात केली. याशिवाय चीननंतर भारत रशियन क्रूडचा दुसरा सर्वात मोठा खरेदीदार आहे, जो एकूण भारतीय आयातीच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त आहे. रशियाने कच्च्या तेलाची आयात थांबवण्याबाबत कोणतेही विधान ऐकले नाही आणि द्विपक्षीय संबंध पूर्वीप्रमाणेच सुरू आहेत. याशिवाय, रशिया एक प्रमुख पुरवठादार राहिला असून भारताने औपचारिकपणे आपली आयात रणनीती बदललेली नाही.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक : पंढरपूर तालुक्यातील मतदानासाठी यंत्रणा सज्ज

## निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे; मतदान प्रक्रियेसाठी १ हजार ७०० अधिकारी कर्मचारी नियुक्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी दि.०७ फेब्रुवारी २०२६ रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. या निवडणुकीत दोन लाख ८५ हजार ८२७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी १ हजार ७०० अधिकारी कर्मचारी नियुक्ती करण्यात आली असून, पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

**३०९ मतदान केंद्रासाठी ३०९ कंट्रोल युनिट व ४०८ बॅलेट युनिट**

तालुक्यातील ३०९ मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया रविवारी उमेदवारांच्या व प्रतिनिधींच्या उपस्थित पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आली. मतदानासाठी मतदान केंद्रावर ३०९ कंट्रोल युनिट व ४०८ बॅलेट युनिट संच तयार करण्यात आले आहेत. तसेच ६४ कंट्रोल युनिट व ११६ बॅलेट युनिट संच राखीव ठेवण्यात आले आहेत. मतदान यंत्राच्या सुरक्षेसाठी आवश्यकती खबरदारी घेण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेसाठी मतदान केंद्राध्यक्ष, सहा. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्र. एक व दोन तसेच शिपाई अशा १ हजार ७०० अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथून मतदान पथकांना साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी २२ टेबलची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त आहे. नियुक्त केलेल्या विशेष वाहनांद्वारे ही पदके नेमून दिलेल्या केंद्राकडे रवाना होतील.



तालुक्यात वाखरी येथील मतदान केंद्र क्रमांक १५८ आदर्श महिला मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे तर टाकळी येथील मतदान केंद्र क्रमांक २४० येथे आदर्श मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे. तसेच कासेगाव येथील मतदान केंद्र क्रमांक २८५ (निकम वस्ती) हे मतदान केंद्र संवेदनशील मतदान केंद्र असुन त्याठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान पार पडणार आहे. तालुक्यातील सर्व मतदारांनी लोकशाही बळकट करण्यासाठी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा असे, आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने शोककळा पसरली आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाविद्यालयाच्या बॅरिस्टर पी. जी. पाटील सभागृहात भावपूर्ण शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

या शोकसभेस रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य बाळासाहेब पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, जी. बी. भायगुडे सर, यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता साळवे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. सुशीलकुमार शिंदे, डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाते डॉ. समाधान माने, डॉ. अनिल चोपडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अमर कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शोकसभेचे प्रास्ताविक पदव्युत्तर पदवी विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी केले. यावेळी मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकताना त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, तत्परता, संवेदनशील नेतृत्व, तसेच आर्थिक-सामाजिक क्षेत्रातील धाडसी निर्णयांचे स्मरण केले. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेणारे नेतृत्व म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी अजित पवार यांनी दिलेले योगदान भरीव असून, विद्यार्थीहिताचे उपक्रम, रयत विज्ञान परिषदेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उभारणीचा संकल्प व तात्काळ मदतीची घोषणा यांचा उल्लेख करण्यात आला. १९९६ पासून विविध समित्यांमध्ये त्यांनी कार्यकर्ता, मार्गदर्शक व नेता म्हणून बजावलेली भूमिका उल्लेखनीय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी अजित पवार हे अभ्यासू, कार्यक्षम व जनसामान्यांशी नाते जपणारे नेतृत्व असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर आभार समारंभ समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी मानले. या शोकसभेस महाविद्यालयातील वरिष्ठ-कनिष्ठ, व्होकेशनल विभागातील कर्मचारी तसेच रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधील सेवानिवृत्त शिक्षक व रयतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नदीजोड प्रकल्पांतील कामांचा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पांतील कामांना गती देण्याच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सविस्तर आढावा घेतला.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प तसेच कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा नदी खोऱ्यात वळविण्यासाठी सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे नदीजोड प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकणातील जलसमृद्ध खोऱ्यांमधील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नाशिक व मराठवाडा भागातील पाणीटंचाई दूर करणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील अतिरिक्त जमिनी पर्यावरणपूरक व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करून महामंडळाचे उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यात येणार आहेत. धरण क्षेत्रालगतच्या या जमिनी सार्वजनिक-खासगी भागीदारी (इइइ) तत्त्वावर विकसित व व्यवस्थापित करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. पुणे व सोलापूर जिल्ह्यांत कार्यवाही सुरू झाली असून या धोरणानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

'नाबार्ड'च्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या सिंचन प्रकल्पांसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित असून त्यापैकी साडेआठ हजार कोटी रुपये जलसंपदा विभागास प्राप्त झाले आहेत. या निधीतून विविध सिंचन प्रकल्पांची कामे सुरू आहेत. सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी साडेसहा हजार कोटी रुपयांचे वितरण करण्याबाबत वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे तसेच कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात पाणी आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

फ्लोटिंग सोलर पॉवर जनरेशन पॉलिसीचा आढावा

जलसंपदा विभागाने तयार केलेल्या फ्लोटिंग सोलर पॉवर जनरेशन पॉलिसीच्या आराखड्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. हा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादर करण्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री विखे- पाटील यांनी दिले.

तसेच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत पाटबंधारे नियम, १९७६ मध्ये प्रस्तावित बदल करण्याबाबतच्या तरतुदी मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येणार असून, त्यासंदर्भातही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध सिंचन प्रकल्प, विकासकामे तसेच नदीजोड प्रकल्पांसाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती सादर करण्यात आली.

## उत्तराखंड – हरिद्वार येथील श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात श्रीविग्रह मूर्ती स्थापना

# श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक समाधी मंदिर भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थळ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हरिद्वार,: श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी सनातन संस्कृतीचे प्रमुख वाहक म्हणून कार्य केले. म्हणूनच आज नव्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीची महानता टिकून आहे. त्यांच्या समाधी मंदिरामुळे भावी पिढ्यांसाठी एका प्रेरणास्थळ निर्माण झाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

उत्तराखंड – हरिद्वार येथील श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात श्रीविग्रह मूर्ती स्थापना समारंभात मुख्यमंत्री फडणवीस प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. या सोहळ्यास माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, प.पू. जुनापीठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरीजी, राम जन्मभूमी मंदिर न्यासाचे स्वामी गोविंददेव गिरीजी, पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया, उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ल, स्वामी अखिलेश्वरानंदजी, स्वामी हरिचेतनानंदजी, स्वामी ललितानंद गिरीजी, महंत देवानंदसरस्वती, विनय रोहिला, प्रदीप बत्रा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय संस्कृतीतील संत परंपरा समाजाला जोडण्याचे, एकसंध ठेवण्याचे कार्य करते. तेच कार्य स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांनी भारत माता मंदिर स्थापनेतून सुरु केले. याशिवाय त्यांनी भारतीय सनातन संस्कृतीच्या जगभरात विखुरलेल्या प्रवाहांना एकत्रित आणण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यांनी आपले सर्व आयुष्य मानवतेच्या कार्यासाठी वाहिले. जिथे कुठे आपत्ती, संकट आले, त्या ठिकाणी स्वामीजी धावून गेले. तिथे त्यांनी सगळे भेद बाजूला सारून मदतकार्य केले. यामाध्यमातून सनातन संस्कृतीची ओळख निर्माण केली. या प्रवासात त्यांनी कित्येकदा अनेक पदांचाही त्याग केला आणि आपल्या वैश्विक कार्याला पुढे नेण्यात धन्यता मानली. त्यामुळेच त्यांना जगभर अद्भूत व्यक्तित्व म्हणून सन्मान मिळाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आज जगभरातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. पण भारतीय सनातन संस्कृती आजही टिकून राहीली आहे असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सनातन विचार भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगणारे आणि सर्वात प्राचीन असे आहेत. आता सरस्वती संस्कृतीच्या उत्खननातूनही या विचारांच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे विज्ञान आणि इतिहास या दोन्ही कसोट्यांवर भारतीय जीवन पद्धती, सनातन संस्कृती समृद्ध असल्याचे सिद्ध झाले आहे. या भारतीय संस्कृतीने विविधता आत्मसात करून, तिच्या वैभवात भर घातली आहे. ही संस्कृती टिकवण्यात स्वामी सत्यमित्रानंदजी यांच्यासारख्या वाहकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. स्वामीजीनी आपल्या आचरण, कार्यातून या संस्कृतीचे पोषण केले. ती भावी पिढ्यांकडे सुपूर्द केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सांस्कृतिक पुनरोत्थानाच्या कार्याला मोठी गती मिळाली आहे. त्यामुळे आता भावी पिढ्याही या सनातन संस्कृतीशी स्वत:ला जोडून घेऊ लागली आहे. त्यांनाही या संस्कृतीचा अभिमान वाटू लागला आहे. यामागेही या संत, महंताच्या कार्याचा बहुमुल्य आधार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वागदरी जिल्हा परिषद गटातील उमेदवार प्रचारार्थ जाहीर सभा !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागदरी/अक्कलकोट

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्या अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील भारतीय जनता पक्षाचे वागदरी जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. राजश्रीताई बसवराज शेळके, वागदरी पंचायत समिती गणाचे उमेदवार श्री. अप्पासाहेब धोंडप्पा किवडे तसेच शिरवळ पंचायत समिती गणाचे उमेदवार श्री. राजेंद्र धुळप्पा बंदीछोडे यांच्या प्रचारार्थ वागदरी येथे जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधत आगामी निवडणुकीत भाजपा उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. या सभेत केंद्र व राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांची माहिती देत ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाची भूमिका स्पष्ट केली. तसेच, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य, शेतकरी व युवकांसाठीच्या योजनांवर भर देत योग्य, कार्यक्षम आणि विकासाभिमुख उमेदवारांना संधी देण्याचे आवाहन केले. यासोबतच येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीत सर्व मतदारांनी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन यावेळी केले.

यावेळी श्री. विजय ढोपरे, श्री. अप्पासाहेब बिराजदार, श्री. रवीकिरण व्हरनाळे, श्री. अविनाश मडीखांबे, श्री. सुनील सिद्धे, श्री. प्रदीप जगताप, श्री. मधुकर सुरवसे, श्री. राजू किवडे, श्री. वीरभद्र स्वामी, श्री. बाळासाहेब भोसले, श्री. अबुबकर शेख, श्री. शिवानंद पटणे, श्री. धनराज बिराजदार, श्री. नाना चव्हाण, श्री. बसवराज शेळके, श्री. धोंडप्पा यमाजी, श्री. कमलाकर सोनकांबळे, श्री. अंबूबाई मंगाणे, श्री. लक्ष्मण भैरामटगी, राजश्रीताई निंबाळे, श्री. निशांत कवडे, श्री. महादेव पोमाजी, श्री. गुलाब पाटील, श्री. शिवाजी सावंत, श्री. शिवशरण पोमाजी आदीसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वा रे स्वयंघोषित निष्ठावंता.. ऐसा कैसा चलेगा....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी जिल्हा परिषदसाठी वागदरी गावाला उमेदवारी देऊ नका असे माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी भाजपाचा बैठकीत मागणी केले होते, अरे निष्ठावंता वागदरीचा जीवावर निवडून यायचे आणि वागदरीकरांच्या तिरस्कार करायचं असे कसे चालेल ? ...

वागदरीचे मतदान पाहिजे, गावाचे आराध्य दैवत परमेश्वर मंदिराकडून टक्केवारी पाहिजे, शिवलिंगेश्वर मठाकडून टक्केवारी पाहिजे, घाळीदास मंदीराकडून टक्केवारी पाहिजे, बसवेश्वर मंदिराकडून टक्केवारी पाहिजे......

वागदरी गावाचे उमेदवार नको......

वा रे स्वयंघोषित निष्ठावंता.....
ऐसा कैसा चलेगा....

सुज्ञ वागदरीकराना आव्हान आहे की शिवसेनेचा नेत्यामागे ३७६ सारख्या गंभीर गुन्ह्यातील बलात्कार प्रकरणातील आरोपी असतील,

तर असे लोक गावाचा विकास कसा करणार?

ज्यांच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह आहे,

ते लोक विकासाच्या मार्गदर्शक होऊ शकत नाहीत.

विकास फक्त रस्ते-नळयांचा नसतो,

तो सुरक्षितता, विश्वास आणि संस्कारांचा असतो -

आणि त्यासाठी नेतृत्व स्वच्छ असावं लागतं.

गंभीर आरोपाखालील व्यक्तींना जवळ ठेवून गावाच्या विकासाची भाषा करणं हे लोकांच्या बुद्धीचा अपमान आहे.

एवढेच नव्हे तर ह्या शिवसेनेचा उमेदवार सोबत असलेले नेते पोस्को मधील आरोपीकडून १ लाख रु. घेणारे,गावाचे गटार बंद करून त्याच्यावर घर बांधणारे, कचराकुंडी चोरीला गेले म्हणून पैसे लुटणारे,ग्रामपंचायत निवडणूक मध्ये मंदिरातील शिवलिंग वर हात ठेऊन शपथ घेऊन दगा फटका करणारे, शेतकऱ्यांना लुटणारे, फक्त ५० हजारासाठी सुतार ताई सरपंच पदावर अविश्वास आणणारे,बसवेश्वर मंदिरासमोरील ६ लाखाचा रोडला तक्रार करून ७० हजार रु तोडी करून पैसे खाणारे आहेत.

त्यामुळे विरोधकांचे भुलथापना बळी न पडता गावाचा विकासासाठी आणि गावातील योग्य उमेदवार निवडून द्या, विनंती...

**– महादेव सोनकवडे**

# माजी आमदार जयंतराव जगताप यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी करमाळा तालुक्यातील माजी आमदार जयंतराव जगताप यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. पूजा भेटीदरम्यान माजी आमदार जगताप यांनी भाजप राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला दिलेल्या समर्थनाबद्दल पालकमंत्री नामदार गोरे यांनी त्यांची विशेष आभार मानले. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये सध्याच्या राजकीय परिस्थितीवर, आगामी काळातील विकास कामावर तसेच करमाळा तालुक्यातील सर्वांगीण प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. माहितीच्या माध्यमातून जिल्हा स्थिर व सक्षम प्रशासन निर्माण करण्याची चर्चा झाली असून, त्यांचा लाभ ग्रामीण भागाच्या विकासासाठी निश्चितच होईल असा



विश्वास पालकमंत्री नामदार गोरे यांनी व्यक्त केला व माजी आमदार जयंतराव जगताप यांनीही आपली भूमिका स्पष्ट करताना तालुका व जिल्ह्यातील हितासाठी योग्य निर्णय घेतल्याची सांगितले विकासाच्या मुद्द्यावर सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याची त्यांनी नमूद केली तसेच राज्यात पंचायत राज्य व्यवस्थेची निर्मिती झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याची भाग्यविधाते देशभक्त नामदेवरावजी जगताप यांनी सोलापूर जिल्हा परिषदेची पहिली अध्यक्ष पद भूषवले होते,त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेचे जगताप कुटुंबीयांची एक आगळी-वेगळी व भावनिक नाते आहे. त्यामुळे या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषदेची प्रतिष्ठा व ग्रामीण भागाचा विकास हा एकच दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून मी भाजप राष्ट्रवादी काँग्रेस माहितीच्या पॅनलला पाठिंबा दिल्याची देखील जगताप यांनी यावेळी नमूद केली.

या सदिच्छा भेटी प्रसंगी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, भाजप प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष रश्मी दिदी बागल, विलासराव घुमरे, गणेश शेवटी, मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, संचालक सतीश नेर बाजार समितीचे संचालक शंभूराजे जगताप, जनार्दन नलवडे खरेदी-विक्री संघाचे संचालक शहाजी शिंगटे आधी मान्यवर उपस्थित होते व या भेटीमुळे करमाळा तालुक्यातील माहितीच्या कार्यकर्त्यात लवचिकतेने निर्माण झाले आहे.

# पंढरपुरात शशिकांत शिंदे यांचे नागेश फाटे यांच्याकडून प्रांताध्यक्षांचे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी): राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रांताध्यक्ष मा. श्री. शशिकांत शिंदे साहेब यांचे पंढरपूर येथे आगमन झाले असता, पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

स्वागतावेळी भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडचे चेअरमन अनिलदादा सावंत, तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सागर पडगळ, पक्षाचे प्रवक्ते महादेव तळेकर सर यांसह पक्षाचे विविध स्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते.

# लक्ष्मी टाकळी नगरपंचायत करण्याची राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी नगरी विकास विभागाने ग्राम पंचायतचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याची परवानगी दिली आहे. नगरपंचायतीचे घोषणा निवडणुकीनंतर होणार आहे. पंढरपूर शहराजवळ एक नवीन नगरपंचायत निर्माण होणार आहे.

पंढरपूर शहराजवळ लक्ष्मी टाकळी ही ग्रामपंचायत आहे. या गावांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून. चांगला विकास झाला आहे यामुळे ग्रामपंचायतचे रूपांतर नगरपंचायत मध्ये करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. याबाबत प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठवण्यात आला होता. या प्रस्तावास नगर विकास विभागाने परवानगी दिली मात्र सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणुकीचे रणधुमाळी सुरू आहे. याबाबत नगरपंचायतीला परवानगी देऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे न्यायालयाचा अपमान होऊ नये त्यासाठी. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक झाल्यानंतर टाकळी नगरपंचायत म्हणून घोषणा करण्यात येणार आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे तेथील नागरिकांना समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६.

# मतदान ७ फेब्रुवारीला, शाळांना ६ व ७ फेब्रुवारी रोजी सुट्टी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणुकीचे मतदान शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.

मतदान कर्तव्याकरिता अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, नियुक्त मतदान पथकांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून तालुकास्तरावरून साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर हे पथक सकाळी ११.३० वाजता नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर पोहोचण्यास सुरुवात करणार आहे.

मतदान प्रक्रिया पार पडणाऱ्या शाळांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या परिपत्रकानुसार शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक होणाऱ्या क्षेत्रातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

ज्या शाळांतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवडणुकीच्या कामाकरिता नियुक्ती केलेली नाही, त्या शाळांना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत शाळा भरविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर आदेशाचे तात्काळ पालन करण्यात यावे, असे प्रभारी जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# मतदानाच्या दिवशी धाराशिव जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी धाराशिव जिल्ह्यातील काही तालुक्यांमधील आठवडी बाजार मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत. मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दि. ७ फेब्रुवारी २०२६ (शनिवार) रोजी मतदान होणार आहे. या दिवशी संभाव्य गर्दी, कायदा- सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी द मार्केट अँड फेअर अँक्ट १८६२ मधील कलम ५ व ५(अ) नुसार हा निर्णय घेण्यात आला




आहे. यास मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही मान्यता दिली आहे. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातील खालील पंचायत समिती हद्दीतील आठवडी बाजार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद राहणार आहेत –

धाराशिव तालुका : पाडोळी (आ), जागजी, बामणी

तुळजापूर तालुका : निलेगाव, जळकोट, आरळी (बु.)

उमरगा तालुका : तुरोरी, समुद्राळ, केसर जवळगा

भूम तालुका : ईट

कळंब तालुका : मंगरुळ, नायगाव, पिंपळगाव (कोठावळा)वाशी तालुका – तेरखेडा, बावी परंडा व लोहारा तालुक्यात या दिवशी कोणतेही आठवडी बाजार नाहीत, अशी माहिती आदेशात नमूद आहे.

मतदानाच्या दिवशी बंद राहणारे हे बाजार संबंधित ठिकाणी इतर दिवशी भरविण्यात यावेत, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन, तहसीलदार, कृषी उत्पन्न बाजार समित्या व संबंधित सर्व यंत्रणांना सूचना देण्यात आल्या असून, स्थानिक वर्तमानपत्रांमधून तात्काळ प्रसिद्धी देण्याचे निर्देश जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.त्यानुसार कळंब तहसिलचे तहसिलदार मा.हेमंत ढोकले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

**सोशल मिडीया सह भोग्यांद्वारे प्रचाराचा धुरळा**

# खामसवाडी जिल्हा परिषद पंचायत समिती गटात बहुरंगी लढत; निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी (प्रतिनिधी) : हनुमंत पाटुळे जिल्हा परिषद धाराशिव व कळंब पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ होत असुन कळंब तालुक्यातील खामसवाडी जिल्हा परिषद गटातील व पंचायत समिती गणातील निवडणूक बहुरंगी होत असुन अपक्षा सह सर्वच पक्षाचा प्रचार अंतिम टप्यात आला असुन गेल्या आठ दिवसांपासून सर्वच उमेदवारांनी आपापल्या परीने कंबर कसुन प्रचार केला आहे. आम्हाला मतदान करा..! अशी भावनीक साद घालत अनेक मतदारांचे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतले आहेत,तर सर्वच उमेदवारांनी निवडुन आल्यास गटातील व गणातील विविध विकास कामांच्या बाबतीत पत्रके छापली असुन मतदारांना आश्वासनांची खैरात दिली असल्याचे चित्र दिसुन येत आहे. गेल्या आठ दिवसांपासून मतदार संघात विविध प्रकारच्या माध्यमातून प्रचाराच्या गाडयावर भोंगे वाजत असुन,सोशल मिडीयाच्या माध्यमातूनही उमेदवारांनी प्रचाराचा धुरळा उडवला आहे. तर सकाळी संध्याकाळी चौकांमध्ये सभांचे आयोजन केले होते. या सभांमध्ये विरोधकांचा समाचार घेतला गेला आहे. खामसवाडी गटांमध्ये एकुण ८ गावांचा समावेश असुन या मध्ये खामसवाडी,गोविंदपुर,मळकरंजा, देवळाली, बोरगाव (बु),ढोराळा, वडगाव (शि),आणि वाठवडा ही गावे आहेत. या गटाचे एकुण (जिल्हा परिषद गटाचे) मतदान (१८,४३६) एवढे आहे. तसेच खामसवाडी गणांमध्ये (९,६१७) एवढे आहे. तर देवळाली गणामध्ये (८,८१९) एवढे आहे. या निवडणुकीत जिल्हा परिषद गटा करीता एकुण ७ उमेदवार रिंगणात असुन या मध्ये महायुतीचे (भाजपा) उमेदवार विश्वास हनुमंत कोकणे,युबीटी (शिवसेना)च्या उमेदवार कु.मनीषा बालाजी वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



(शरद पवार) बालाजी प्रल्हाद आल्टे, भापसे पार्टी चे दिपक महादेव ताटे, वंचित बहुजन आघाडीचे अशोक अनंत कसबे,तर अपक्ष म्हणून प्रल्हाद नामदेव तुपसौदरे,(अपक्ष उमेदवार) जितेंद्र भारत सावंत, यांच्यात लढत होत आहे.

तर खामसवाडी पंचायत समिती गणा मध्ये एकुण ४ उमेदवार रिंगणात असुन या मध्ये महायुतीचे उमेदवार (भाजपा) म्हणून किरण बापुराव पाटील,युबीटीचे (शिवसेना) सौ. सुवर्णा दयानंद पाटील, बहुजन वंचित आघाडीचे नितीन व्यंकट बंडगर,तर अपक्ष म्हणून महेंद्र भागवत शेळके हे उमेदवार आहेत. तर देवळाली गणामधुन एकुण ५ उमेदवार मैदानात उतरले असुन या मध्ये महाविकास आघाडीचे (भाजपा)सचिन अण्णा एडके, युबीटी (शिवसेना) चे उमाकांत बन्सी एडके, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) बालाजी लक्ष्मण वाघमारे, तर (अपक्ष म्हणून)विठ्ठल उत्तम एडके व बळीराम शाहू नवगिरे हे पंचायत समीती गणा करीता निवडणूक रिंगणात आहेत. दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री दहा वाजता प्रचार संपला असून दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असुन दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. यामध्ये कोणत्या उमेदवाराला नागरिक मतदान रुपी आशीर्वाद देऊन गुलाल लावतील हे निकाला नंतरच स्पष्ट होणार..! असल्याने या निकालाकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# नंदगाव जिल्हा परिषद गटात भाजपा महायुतीच्या पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड): सध्या होऊ घातलेल्या तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गटातील व गणातील भाजप उमेदवाराच्या पदयात्रेला जनतेतून प्रचंड प्रतिसाद मिळत असून या प्रचार पदयात्रेत ग्रामस्थ,युवकासह महिलांचा ही मोठा सहभाम असल्याचे दिसून येत आहे.

नंदगाव जिल्हा परिषद गटातून येथिल सिध्देश्वर कोरे हे भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार म्हणून कमळ या चिन्हावर निवडणूक लढवीत असून या गटांतर्गत येणाऱ्या नंदगाव पंचायत समिती गणातून भाजपा महायुतीचे उमेदवार म्हणून रोहिणी विवेकानंद मिलगिरी तर याच गटांतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातुन एक निष्ठावंत व अभ्यासू व्यक्तीमत्व असलेले लोहगाव येथील भिवाजी इंगुले हेही कमळ या चिन्हावर महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहेत.या गटातील आणि गटांतर्गत येणाऱ्या गणातील प्रचारार्थ काढण्यात आलेल्या पदयात्रेस जनतेतून मोठा प्रतिसाद मिळतआहे.

. खुदावाडी गणातील खुदावाडी,वागदरी,येडोळा, लोहगाव,गुजनूर,दहिटणा आदी गावातून पदयात्रा काढण्यात आली.या पदयात्रेत विकासाच्या मुद्द्यावर चर्चा करत तुळजापूर तालुक्याचे कर्तव्यदक्ष आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली नंदगाव गटात झालेल्या आणि होत असलेल्या विकास कामाचा मुख्य मुद्दा करून मतदाराना प्रभावित करताना दिसून येत आहे.

# वागदरी जिल्हा परिषद गटात काँग्रेसला मोठे खिंडार

## आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा वागदरी जिल्हा परिषद गट काँग्रेससाठी हादरवून टाकणारा ठरला आहे. वागदरी परिसरातील काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते व प्रमुख नेत्यांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या प्रभावी नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या घटनेमुळे वागदरी गटात काँग्रेसला मोठे खिंडार पडले असून भाजपाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे.



अक्कलकोटचे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी काँग्रेसला रामराम ठोकत शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर काँग्रेसला हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे. वागदरीसारख्या परंपरागत काँग्रेसच्या प्रभावी भागात घडलेल्या या घडामोडीने तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी, उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये वागदरीचे माजी सरपंच रवी किरण वरनाळे, डॉ. शरण वरनाळे, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, शिवराज मंत्री पोमाजी, अल्पसंख्यांक समाजातील नेते इस्त्राईल नदाफ, माजी सरपंच व जिल्हा परिषद सदस्य विजय ढोपरे, शंकर घुगरे, विकास नंजुडे, सिद्धारूढ धड्डे, श्रीशैल पोमाजी, सुभाष शिरगण ,बाबू मोरे, गणेश शिंदे, शिवाजी सावंत, परमेश्वर मोहरकर, आप्पासाहेब मुल्ला, सुनील शिरगण,प्रभू स्वामी, उपसरपंच पंकज सुतार, यावेळी भारतीय जनता पार्टी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

हा पक्षप्रवेश सोहळा आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी युवा नेता बसवराज शेळके प्रदीप जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, अप्पू बिराजदार प्रदीप पाटील सुनील सावंत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्यासह वागदरी जिल्हा परिषद गटातील असंख्य प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी म्हणाले,

वागदरी गटाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजप कटिबद्ध आहे. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवणे, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही एकजुटीने काम करू.

दरम्यान, काँग्रेसमधून होत असलेले सततचे पक्षांतर आणि कार्यकर्त्यांची गळती पाहता आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजप अधिक भक्कम स्थितीत जाण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. वागदरी गटातील या मोठ्या राजकीय घडामोडीकडे संपूर्ण अक्कलकोट तालुक्याचे लक्ष लागले आहे.




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**आज आपला माणूस आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांचा विकास कामाला, व्यक्तिमत्व, नेतृत्व स्वीकारून भुरीकवठे गावचे मातब्बर नेते काँग्रेसचे तालुका युवक अध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य मा. सिद्धाराम (अण्णा) खुने सावकार तसेच रंगनाथ गुरव, लक्ष्मण हिरके व मल्लिकार्जुन बिराजदार उर्फ भैया यांच्या सह अनेक कार्यकर्ते भाजप पक्षामध्ये प्रवेश केले आहे.**

# मुस्लिम समाजातील मान्यवरांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील सांगवी येथील मुस्लिम समाजातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक धोरणांवर विश्वास ठेवून तसेच सांगवी भागात झालेल्या विविध विकासकामांनी प्रेरित होऊन भारतीय जनता पक्षात अधिकृत पक्षप्रवेश केला. यावेळी अक्कलकोट तालुक्याचे कार्यसम्राट पाणीदार लोकप्रिय लोकनायक लोकनेते लोकाभिमुख जननायक जनसेवक आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश व सर्व मान्यवरांचे पक्षात स्वागत करून पुढील वाटचालीसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या




पक्षप्रवेशामुळे सांगवी परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली असून, विकासाच्या वाटचालीला नवे बळ मिळाले आहे.

यावेळी श्री. हाजीमलंग मुजावर, श्री. आलम मुल्ला, श्री. आसिफ शेख, श्री. काशीम शेख, श्री. इकबाल पठाण, श्री. गौसपाक पठाण, श्री. साकिब शेख, श्री. सरफराज शेख, श्री. सुलतान शेख, श्री. आरिफ शेख, श्री. निसार पठाण, श्री. साजिद कागदे, श्री. सद्दाम कागदे, श्री. मोहसीन जमादार, श्री. आसिफ जमादार, श्री. शाहिद जमादार, श्री. बक्तावर जमादार, श्री. हाजीमलंग जमादार, श्री. मुस्तफा कागदे, श्री. मोहसीन शेख, श्री. एजाज शेख, श्री. खाजू मुल्ला, श्री. शौकत शेख, श्री. बाबू मशाक शेख, श्री. अमन मुल्ला, श्री. अब्बास मुल्ला, श्री. रौफ मुल्ला, श्री. सुफियान बिचकुते, श्री. साहिल शेख, श्री. चांद पठाण, श्री. मौला चाबुकस्वार, श्री. रमजान मुल्ला, श्री. शबिर पठाण यांनी पक्षप्रवेश केला.

# कर्तृत्व, संस्कार आणि सेवेचा संगम : राजेश्री बसवराज शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संधीचं सोनं करणारी माणसं फार कमी असतात आणि त्या मोजक्या लोकांत नाव घेतलं जातं ते राजेश्री बसवराज शेळके यांचं. वागदरीसारख्या ग्रामीण भागातून, संस्कारांची शिदोरी, शिक्षणाची ताकद आणि समाजसेवेची ओढ मनाशी बाळगून पुढे आलेलं हे नेतृत्व केवळ योगायोगाचं नाही, तर जिद्द, चिकाटी आणि मूल्यांची देण आहे.

वागदरीच्या शेळके परिवाराच्या मोठ्या सुनबाई असलेल्या राजेश्री यांचं माहेर कळसगोंडा. वडील हे सदनशील शेतकरी, पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे समाजाशी नातं जपणारे, मदतीचा हात पुढे करणारे समाजसेवक. लहानपणापासूनच आपण लोकांच्या उपयोगी आलंच पाहिजे ही शिकवण त्यांच्या मनात खोलवर रुजली. गोरगरीब, गरजू लोकांसाठी काहीतरी करावं, ही भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव बनली.

च, इ.एव., ऊ.एव. इतकं संपूर्ण शिक्षण त्यांनी शासकीय शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पूर्ण केलं. संघर्षाची जाण, कष्टाचं मोल आणि शिक्षणाची किंमत त्यांना स्वतःच्या अनुभवातून कळली. म्हणूनच शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि महिला सक्षमीकरण हे विषय त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळचे आहेत. अभ्यासपूर्ण मांडणी, मुद्देसूद भाषण आणि संयत पण ठाम भूमिका ही त्यांची खासियत ठरते.

वागदरी पंचक्रोशीत शेळके हे नाव केवळ आडनाव नाही, तर विश्वासाचं प्रतीक आहे. दानशूर परिवार म्हणून ओळख असलेल्या या घराण्यामुळेच वागदरीत शैक्षणिक संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. गेली साठ वर्षे एस. एस. शेळके प्रशाला हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देत आहे. शेळके सावकारांकडे गेलेला माणूस रिकाम्या हाताने परत गेला नाही ही म्हण आजही लोकांच्या ओठांवर आहे.

अशाच दानशूर, सेवाभावी वातावरणात राजेश्री यांचा विवाह बसवराज शेळके यांच्याशी झाला. त्यांच्या शिक्षणाला, विचारांना आणि कार्याला येथे आणखी बळ मिळालं. आज त्या संस्थेत अध्यापन करत असून, एक उत्तम, आपुलकीची आणि प्रेरणादायी शिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांच्या मनात खास स्थान निर्माण केलं आहे.

शेळके परिवाराची सामाजिक-राजकीय परंपरा देखील तितकीच गौरवशाली आहे. १९९१ साली रत्नाबाई शेळके भारतीय जनता पार्टी कडून राजकारणात उतरल्या आणि जिल्हा परिषद निवडणूक जिंकून लोकसेवेचा विश्वास सार्थ ठरवला. तब्बल



३५ वर्षांनंतर, २०२६ मध्ये पुन्हा एकदा नियतीने शेळके परिवाराला लोकसेवेची संधी दिली आहे. यंदा राजेश्री बसवराज शेळके या जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत.

राजकीय समीकरणं बदलली असतील, पण शेळके परिवारावरचं लोकांचं प्रेम आजही तसंच आहे. राजेश्री या नवख्या असल्या, तरी त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, समाजसेवेची प्रामाणिक ओढ आणि उच्च शिक्षण हे त्यांचं मोठं भांडवल आहे. संवेदनशील मन, अभ्यासू दृष्टी आणि सेवाभावी वृत्ती यांचं सुंदर मिश्रण असलेलं हे नेतृत्व वागदरी जिल्हा परिषद मतदारांना नक्कीच आश्वस्त करेल, अशीच अपेक्षा आहे.

ही केवळ निवडणूक नाही, तर मूल्यांची, परंपरेची आणि नव्या दमाच्या कर्तृत्वाची कसोटी आहे

आणि या कसोटीत राजेश्री बसवराज शेळके निश्चितच उजवी ठरतील, असा विश्वास अनेकांच्या मनात रुजत आहे.

**– संतोष पोमाजी, वागदरी**

## हक्काचं निधी टक्केवारी घेऊन वागदरी जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य तानवडे यांचे काळे कारनामे



अक्कलकोट/प्रतिनिधी : गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत वागदरी जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या सदस्य आनंद तानवडे वागदरी मतदार संघांसाठी उपलब्ध असलेला हक्काचे निधी ४० टक्के कमिशन घेऊन बार्शी तालुक्यातील १३ गावांना निधी विकणारा माजी जिल्हा परिषद आनंद तानवडेला त्याची जागा मतदार नक्कीच या निवडणुकीत दाखवणारच असे मत आमच्या प्रतिनिधिशी बोलताना सुनील सावंत म्हणाले.

सोलापूर जिल्हा परिषद मध्ये वागदरी गटाचे प्रतिनिधित्व करत असताना आनंद तानवडे यांनी

१. तावडी ,२. रातंजन, ३. इंदापूर ,४. नारेवाडी,५. उकडगांव, ६. श्रीपतपिंपरी, ७. शेंद्र्ओ, ८. बोरगाव खू

९. मौ .पिंपरी, १०. मौ. तुर्क पिंपरी,११. घारी,१२. नारी, १३. रऊळगांव

या बार्शी तालुक्यातील १३ गावांना नाला खोलीकरण व सरळीकरण कामाचे चाळीस टक्के प्रमाणे विकून खाल्लेले आहेत. निवडून यायचे आपल्या मतदार संघात आणि विकून टक्केवारी खायच बार्शी तालुक्यात. असे कारनामे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे यांनी केले आहे आता मतदार जागृत झाले असून त्यांनी विकासाचे व्हिजन असणाऱ्या भाजपचे उमेदवार राजेश्री शेळके यांना मोठया मताने निवडून देतील असेही सुनील सावंत यांनी सांगितले.


### तिसरा अपत्य असताना खोटं बोलणारा आनंद तानवडे जनतेला कसं खरं बोलतील

# टक्केवारी घेऊन स्वतःचे भले करून घेणाऱ्या मालकाला मतदार जागा दाखवतील : सुनील सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/विशेष प्रतिनिधी :

स्वतःच्या स्वार्थासाठी स्वतःचे मुलं नसल्याचे खोटं बोलणाऱ्या आनंद तानवडे यांनी स्वतः उभे केलेलं उमेदवाराचे पराभव दिसत असताना दिशाभूल करणारे खोटे पत्रक काढून वागदरी गावाचे बदनामी करणाऱ्या मतदार धडा शिकवतील असे सुनील सावंत यांनी म्हणाले




आनंद तानवडे यांचं तिसरा अपत्य मुळे अपात्र झाल्याने व तसे पुणे विभागीय आयुक्त यांनी निकाल दिल्याने त्यांना जिल्हा परिषद उमेदवारी देण्यात आले नाही त्या उलट भाजपाकडून त्याचे काका बसवराज तानवडे यांना शिरवळ जिल्हा परिषद उमेदवारी देण्याचे फायनल झाले असता केवळ वागदरी गावास व शेळके परिवाराला उमेदवारी देऊन नका असे म्हणून भाजपाशी गद्दारी करून शिंदे गटात गेलेल्या आंनद तानवडे यांनी पक्षनिष्ठा शिकवू नये मला उमेदवारी दिले नाही म्हणून प्रचार करत भाजपने माझ्यावर अन्याय केल्याचे सांगत फिरण्यापेक्षा स्वतःच तिसरा अपत्य असल्याने उमेदवारी दिली नाही व स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष सोडल्याचे जनतेला सांगणे सोडून रडत खोटं बोलल्यावर कधी मत मिळत नसतात वागदरी गावामध्ये दिलेल्या निधी मध्ये किती टक्केवारी घेतलंय ते त्यांनी सांगावे दहा लाखाच्या कामासाठी एक लाख टक्केवारी घेऊन निधी दिल्याचे सांगत आहे हे प्रथम आत्म चिंतन करावे

जिल्हा परिषद सदस्य असताना आंनद तानवडे यांनी पोलीस पाटील भरती मध्ये लाखो रुपये लुटले आहे व शिक्षक बदली साठी पन्नास हजार ते एक लाख पर्यत पैसे घेतले आहे याला समज सेवा म्हणायचं का असे जनतेतून प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे







स्वतःच्या भावाचं पराभव दिसत असताना एक खोटं पत्रक काढून शिक्षण संस्थेचे बदनामी करणाऱ्या आंनद तानवडे एक गोष्ट लक्षात घ्यावे गेल्या पन्नास साठ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात प्रामाणिक सेवा देणाऱ्या शेळके परिवार यांनी केलेलं कार्य थोडं बघावं परमेश्वर विद्या वर्धक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री एस एस शेळके प्रशाला आहे या संस्थेतून अनेक अधिकारी नोकरदार झालेले आहेत गरीब कुटूंब शिक्षणपासून वंचित राहू नये म्हणून मागासवर्गीय वसतिगृह स्थापन करून ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण देण्याचे काम केले आहेत हे शिक्षण संस्था वागदरी सह वागदरी जिल्हा परिषद गटातील श्वास आहे याबाबत बोलताना थोडं अभ्यास करून बोलाव

प्रत्येक निवडणुकीत भाजपाशी गद्दारी करून विरोधकांशी हात मिळवणूक करणे हे तुमच काम आहे आपण स्वतःला निष्ठावंत भाजप समजत होता तर दोन वेळा वागदरीच्या भाजपा कार्यकर्ते निवडून आणण्यासाठी रात्र दिवस काम केले आहेत त्याच वागदरीकरासाठी एक संधी मिळाल्यावर त्यांना सहकार्य करायचं सोडून वागदरी जिल्हा परिषद उमेदवारी मिळाल्यामुळे पक्ष बदलणाऱ्यांची नीतीमता काय आहे असे वागदरीकर विचारत आहे

या सर्वांच दखल जनतेने घेतलेलं असून यांची जाणीव निवडणुकीच्या निकालातून दिसेल